# सेवक वार्ता

ऑगस्ट-२०२१ वर्ष -२, अंक-१०

सेवानिवृत्त वन कर्मचारी संघ, महाराष्ट्, पुणे कार्यालय - ब-८, सारस नगर सोसायटी, शुक्रवार पेठ, पुणे - २

## सेवक संघ धुळे शाखेची सर्वसाधारण वार्षिक सभा संपन्न!

धुळे शाखेची सन २०२०-२१ या आर्थिक वर्षाची सर्व साधारण वार्षिक सभा दि.१४-८-२१ रोजी नियोजित कार्यक्रमानुसार सकाळी ११ ते ३ वाजे दरम्यान यशस्वीपणे संपन्न झाली. सभेत खालील अजेंड्यानुसार कामकाज झाले.

(१) धुळे शाखेने सन २०२२१ या वर्षात केलेल्या कामाचा आढावा.

(२) धुळे शाखेचे सदस्य नोंदणीचा आढावा.

(३) धुळे शाखेचे सन२०२१-२२ साठी वार्षिक कार्यक्रम धोरण व अंदाज पत्रक ठरविणे

(४)पुढील वर्षी होणाऱ्या सेवक संघाच्या रौप्यमहोत्सवी

(५) स्मरणिकेसाठी लेख, जाहिराती छायाचित्रे, उपक्रम बाबत व योगदानावर मंथन.

(६) सन २०२०-२१ चा धुळे शाखेचे रोकड वहीप्रमाणे वार्षिक हिशोब सादरीकरण.

(७) सन २०२१ ते २०२४ साठी नवीन कार्यकारिणीची निवड- यात जुन्या कार्यकारिणीत अंशत: बदल होउन उपाध्यक्ष पदी श्री. जी.के. निकम व सहकार्यवाह पदी श्री. बी. आर. छल्लारे यांची निवड झाली.

मागील सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणेचा मुद्द्यासंबंधी नोंद अभिलेख संबंधितांकडून व सेवक संघाचे नियुक्त सनदी लेखापाल यांनी प्रमाणित केलेला अंकेक्षण अहवाल उपलब्ध न झाल्याने कामकाज होउ शकले नाही.

(८)श्री. माणिक भोसले उप वन संरक्षक, धुळे यांचे हस्ते सर्वश्री मुकेश कडू गुजर, मनोज शालिग्राम पाटील, अनिल सुरेश पाटील या वन रक्षकांना उत्कृष्ठ क्षेत्रीय कामाबद्दल सन्मान पत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात आले.

श्री. माणिक भोसले साहेब यांनी धुळे शाखेचे उपक्रमाचे कौतुक करून छान शैलीत दिलखुलास मनोगत व्यक्त केले.

सभेसाठी श्री. एन.एम. निकुमे सेवक सदस्य यांनी त्यांचे शेतावरील फार्महाउस निशुल्क उपलब्ध करून दिले होते.

श्री.भोसले साहेब यांचे हस्ते श्री जयप्रकाश पाटील, सचिव, धुळे शाखा यांनाही, कार्यरत वन कर्मचा-यांना विविध सामाजिक माध्यमातून देत असलेल्या कायदे व सेवा नियम विषयक, मोफत मार्गदर्शनाबद्दल सन्मान पत्र, शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात

### या अंकात . . . .

धुळे शाखेची सर्वसाधारण वार्षिक सभा संपन्न..१
वन रक्षकांना उत्कृष्ठ कामाबद्दल सन्मानपत्र. १
विशेष वृत्त . . . . . . . . . . १
धुळे शाखेची नूतन कार्यकारिणी. . २
विशेष असे काही. . . . . २
सेवक संघ,उपविधीची ओळख.४. २
सेवक संघात सदस्य होणाऱ्या पहिल्या महिला. २









कन्हारगाव येथील अभयारण्यातील वनस्पतींच्या आणि वन्यप्राण्यांच्या जैवविविधतेचे सर्वेक्षण करण्याचे काम प्रा. डॉ. उमाकांत देशमुख, जनता महाविद्यालय,चंद्रपूर व श्री. अभय उजागरे,वन्यजीव अभ्यासक, जळगाव यांचे सहयोगाने यशस्वी - -रित्या पूर्ण करणेत आले आहे. त्यांचे लवकर अहवाल प्राप्त होतील.



सेवक संघ, धुळे शाखेच्या वतीने धुळे वनवृत्त दौऱ्यावर आलेले श्री. विजय गोडबोले साहेब वन संरक्षक, भूमि अभिलेख, नागपूर, यांची सदिच्छा भेट घेतली. त्यांना बारीपाडा रानभाज्या माहिती पुस्तिका व सेवक संघ महाराष्ट्र घडीपत्रिका भेट दिली.

## धुळे शाखेची नूतन कार्यकारिणी

दि.१४-८-२१ रोजीचे सर्व साधारण वार्षिक सभेत खालीलप्रमाणे नूतन कार्यकारिणी गठीत करणेत आली.

अध्यक्ष - श्री. एस. के. गवळी
उपाध्यक्ष - श्री. जी. के. निकम
सचिव- श्री. जे. ए. पाटील
कोषाध्यक्ष- श्री. एस. आर. पाटील

सेवक संघात सदस्य होणाऱ्या पहिल्या महिला श्रीमती सुमनबाई के.बावा



## सेवक संघ,उपविधीची ओळख

### सेवक संघ, महाराष्ट्राचा सुधारीत उपविधी (भाग - ४)

९) संघाचे मध्यवर्ती व वृत्तस्तरीय कार्यकारी मंडळ व पदाधिकारी यांची रचना
९.१) संघाचे विस्तारित कार्यक्षेत्र लक्षात घेता, मध्यवर्ती कार्यकारी मंडळामध्ये १८ (अठरा) पदाधिकारी खालीलप्रमाणे राहतील १)अध्यक्ष-१, २) उपाध्यक्ष-१, ३)उपाध्यक्ष-२, ४) कार्याध्यक्ष, ५)कार्यवाह, ६) सहकार्यवाह, ७)कोषाध्यक्ष, ८) ८ ते १८ पुणे, नाशिक, ठाणे, औरंगाबाद, कोल्हापूर, धुळे, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, यवतमाळ, व गडचिरोली या ११ वनवृत्तावरील कार्यकारिणीचे ११ सहअध्यक्ष असे मिळून एकूण १८ सदस्य असतील. ९.२) उपविधी क्रमांक १५.३ अनुसार संघाचे मध्यवर्ती कार्यकारी मंडळ जरूरीप्रमाणे संघाचे सभासद अथवा अन्य तज्ञ यांची संघाच्या कार्यकारिणीवर नियुक्ती करू शकेल. ९.३) संघाच्या कार्यकारणी मंडळ पदाधिकाऱ्यांची निवड वार्षिक सर्वसाधारण सभा पॅनेल पद्धतीने करेल. आणि त्या कार्यकारी मंडळाची मुदत तीन वर्षांची राहील. ९.४) वनवृत्त स्तरावरील शाखेच्या कार्यकारी मंडळामध्ये अध्यक्ष, उपाध्यक्ष, कार्यवाह, सहकार्यवाह व कोषाध्यक्ष असे पाच पदाधिकारी असतील.

१०) संघाच्या मध्यवर्ती कार्यकारी मंडळाचा कार्यकाल व निवडणूक पद्धती- मध्यवर्ती कार्यकारी मंडळ १८सभासदांचे असेल व वृत्तस्तरीय कार्यकारी मंडळ ५ सभासदांचे असेल. संघाच्या कार्यकारी मंडळाच्या पदाधिका-यांची निवड वार्षिक सर्वसाधारण सभा पॅनेल पद्धतीने करेल. आणि त्या कार्यकारी मंडळाची मुदत तीन वर्षांची राहील. कार्यकारी मंडळातील सभासदांचे त्यागपत्र घेण्याचा किंवा स्वीकारण्याचा आणि त्या पदाधिकाऱ्याच्या पदावर सुयोग्य सभासदांची निवड तात्पुरत्या स्वरूपात करण्याचा अधिकार कार्यकारी मंडळास राहील.अशा पदाधिका-यांची निवडकार्यकारी कार्यकारी मंडळ याप्रमाणे राहील.

## विशेष असे काही.

सेवक संघ रौप्यमहोत्सवानिमित्त प्रकाशित विशेष अंकासाठी लेख मर्यादा ५०० शब्द निश्चित करणेत आली आहे.कृपया, आपले लेख mmkul7@gmail.com या ईमेलवर पाठवावेत

*अमरावती सेवक संघ शाखा आजीवन सदस्य श्री. देवकिशोर गडपांडे यांनी लिहिलेले पुस्तक "वणवा आणि जाळरेशा" या पुस्तकाचे विमोचन झाले.

---

## खास बातमी

सेवक संघ धुळे शाखेत श्रीमती सुमनबाई केवळपुरी बावा या सेवानिवृत्त रोपवाटीका माळी यांनी आजीवन सदस्य म्हणून नोंदणी केली आहे. सेवक संघात सदस्य होणाऱ्या त्या पहिल्या महिला मानकरी ठरल्या आहेत.

केवळ खाजगी वितरणासाठी
प्रकाशक - सेवक संघ, महाराष्ट्र.पुणे
संपादन - एस. के. गवळी